Name :- Ridhi Rohit Gujar Std :- VIII/Rose

Second rank in Marathi

## वृद्धाश्रम काळाची गरज.

'जुने ते सोने' या म्हणीप्रमाणे 'वृद्ध ते चांगले' असे बोलायला हरकत नाही पण हल्ली वृद्ध म्हटले की 'कपाळाला' नकटीच्या लग्नात येणाऱ्या विघ्नाइतक्या आठ्या पडतात.

आपल्या प्राचीन संस्कृती माणसाच्या आयुष्याचे व जीवनक्रमाचे वर्गीकरण केले आहे. त्या चार आश्रमांमध्ये तिसरा आश्रम म्हणजे वानप्रस्थाश्रम. ज्या काळात 'प्राप्ते तु षोडषे वर्षे पुत्रम् मित्रवदाचरेत्' अशी परिस्थिती निर्माण होते त्या वेळी Generation Gap का म्हणतात ती वस्तू अचानक मधे बिब्बा घालते आणि मुलाचे विचार वडिलांच्या विचारांशी पटत नाहीत. 'आपला मुलगा सुनेच्या मुठीत गेला' म्हणून केलेला आक्रस्ताळेपणा हे सर्व टाळण्यासाठी संसारमुक्त होऊन वृद्धाश्रमात गेलेले बरे! नाहीतर नटसम्राट गणपतराव प्रमाणे आपलेही कोकरू आपल्याला चोर ठरवायचे. शिवाय कॉंक्रीटच्या जंगलात जागेची अडचण असतेच. पण ज्या घरात जी स्वप्ने, जी आकांक्षा ज्या घरात फुलवली व फुललेली पाहताना त्या घरातुन निघून जाने हे अशक्य आहे. प्राचीन काळी वृद्धाश्रम ही त्या काळातील गरज होते. पण आज वृद्धाश्रमात बापाला घालवून व बापाल घरातून हकलून देणाऱ्या त्या प्रत्येक मुलाला त्या विषय किती आदर आहे. हे ही दिसून येते असे म्हणतात की जागेची अडचण हे तर फक्त सबब आहे आणि

घरात जागा नाही म्हणून बापाला गॅलरीत झोपवायचे असा देखावा करणारे काही कमी नाही आहे. ज्यांनी आपल्यासाठी जन्मभर खस्ता खाल्ल्या, आपल्याला मोठे केले त्यांबदल आदर बाळगणे हे स्वाभाविक आहे. व त्यांची सेवा करणे हे कर्तव्य आहे याची जाण प्रत्येक मुलाने ठेवलीच पाहिजे

हलकीफुलकी कामे करणे, मुलांना शाळेत पोहचवणे, मुलांचा अभ्यास घेणे, आईवडिलांचे प्रेम देणे हे कोण करणार ? जगात प्रत्येकच अनुभव स्वत:च्या हिंमतीवर जबाबदारीवर घ्यायचा म्हटले तर मिळालेले आयुष्य अपुरे पडेल. अशा वेळी आधीच ठेच लागलेल्या अनुभवी वृध्दांविवाय अनुभवाचे बोल कोण सांगणार ?

आधार नसलेल्या हाताला,
आधार कुणी घावा....
बाप म्हातारा झाला म्हणून,
का वृध्दाश्रमात न्यावा....
ज्यांनी फक्त तुमी,
स्वप्ने साकार केली....
त्याला हा दिवस का धावा...
आईची माया लेकरा,
विसरला रे तू भावा...
आधार नसलेला हाताला,
खरंच आधार कुणी घावा
आई बाप म्हातारे झाले
म्हणून का वृध्दाश्रमात न्यावा .....

धन्यवाद ......!